सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
...नापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
POSTAL REG NO. SLP/32/2015-2017
बुधवार, दि. २० डिसेंबर २०१७ । युगाब्द ५११९ । शिवशक ३४४ । पाने ८ । किंमत ४ रुपये । वर्ष २ रे अंक ११४

भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

## राष्ट्रीय स्पर्धेसाठी हिंदवी सावंतची निवड

**कोरेगाव :** शिवाजी उदय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत हिंदवी सावंत हिने गोल्ड मेडल मिळविले. हिंदवी ही एकलव्य तायक्वांदो ॲकॅडमीची विद्यार्थीनी असून तिने सब ज्युनिअर गटात १८ किलो खालील वजनगटात प्रथम क्रमांक मिळविला.



२३ ते २५ डिसेंबर रोजी कोलकत्ता येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे.

हिंदवीला विनय खंडाईत, सुमित मंडल यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल तिचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.